राज्यामध्ये वाढत्या व्यसनाधीनतेमुळे महिलांवरील अन्याय, अत्याचार वाढत चालले आहेत. शाळेत जाणाऱ्या अल्पवयीन मुलींवर बलात्कार करून पुरावे नष्ट करण्याच्या हेतूने त्यांची हत्या केली जाते. कोपर्डीसारखी अनेक प्रकरणे वाढत चालली आहेत. हा मानवतेला लागलेला कलंक आहे.

युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती आहे. गाव, समाज, राष्ट्राचे उज्वल भविष्य ही युवाशक्तीच घडवू शकेल यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. मात्र आमची युवाशक्ती ही वाढत्या व्यसनाधीनतेमुळे बर्बाद होत चालली आहे. ही राज्याची, राष्ट्राची, समाजाची फार मोठी हानी होत चालली आहे. ही होणारी हानी पैशांनी भरुन निघणार नाही.

**ग्राम संरक्षक दल-** वाढत्या देशी, विदेशी, हातभट्टीच्या अवैध दारूला आळा घालण्यासाठी आणि मटका, जुगार या सारख्या अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी राज्यातील **ज्या गावची ग्रामपंचायत आणि त्या गावची ग्रामसभा, नगर परिषद, नगरपालिका, महानगर पालिका, वॉर्ड मधील लोक मतदारांच्या २५ टक्के लोक ठराव करतात** की, आमच्या गावामध्ये किंवा वॉर्डमध्ये सामाजिक, राष्ट्रीय दृष्टिकोन असणाऱ्या सर्व जाती-धर्माच्या चारित्र्यशील कार्यकर्त्यांचे ग्राम संरक्षक दल स्थापन करीत आहोत.



दिवसेंदिवस महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, दारूबंदी आणि इतर अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी गावातील ग्राम सभेने, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, वॉर्ड मधील नागरिकांनी स्थापन केलेल्या ग्राम संरक्षक दलास कायद्याने अधिकार देणे बाबत...

आमच्या गावातील किंवा वॉर्ड मधील देशी, विदेशी, हातभट्टीची दारू, मटका, जुगार या सारख्या अवैध धंद्यांना आळा घालण्याचे आम्ही सर्वांनी ठरविले आहे. त्यासाठी शासनाने सशक्त, कठोर कायदा करून आमच्या ग्राम संरक्षक दलाला कायद्याने अधिकार देण्यात यावेत.

**लोकशाहीची व्याख्या लोकांची, लोकांनी, लोक सहभागातून चालविलेली शाही ती लोकशाही अशी आहे.** तर शासनाने ग्राम संरक्षक दलाला मान्यता देणे आवश्यक आहे. लोक सहभागाशिवाय दारू आणि अवैध धंद्यांना आळा बसू शकणार नाही हे स्पष्ट झाले आहे.

राज्यातील दारूबंदी किंवा इतर अवैध धंद्यांना आळा घालणे फक्त पोलीस विभाग किंवा राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्याकडून होणार नाही असे स्पष्ट दिसते. कारण स्वातंत्र्यानंतर ६८ वर्षात दारू किंवा अवैध धंदे बंद न होता दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. राज्याच्या पोलीस महासंचालकांनी विभागीय, जिल्हा स्तरीय वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना अवैध धंदे बंद करण्याबाबत गेल्या १० ते १२ वर्षात ५० पेक्षा अधिक परिपत्रके काढली आहेत. मात्र त्या संबधाने काहीच कार्यवाही झालेली नाही. याउलट राज्यात अवैध धंदे वाढत चालल्याचे दिसते.

राज्याच्या पोलीस महासंचालकांची कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी समाज हिताची महत्वाची पत्रे कचरा टोपलीत जात असतील तर राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेचे काय होणार हा प्रश्नच आहे. **आज खेड्या-पाड्यातील हातभट्टीची दारु व अवैध धंदे याला पोलीस विभागच खतपाणी घालत आहे अशी चर्चा जनता सर्वत्र करताना दिसते. दारु किंवा अवैध धंद्यांची तक्रार करण्यासाठी कुणी पोलीस स्टेशनला गेला तर त्याची दखल घेतली जात नाही.** दखल घेण्याच्या आधी अवैध धंदेवाल्यांना सावध केले जाते. त्यासाठी पोलीस खाते किंवा राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या बरोबरच कायद्याने जन सहभाग वाढविणे आवश्यक आहे. जनतेच्या ग्राम संरक्षक दलाला कोणतेही निर्णय घेण्याचे अधिकार नसावेत. मात्र **गावात किंवा वॉर्डमध्ये ग्राम संरक्षक दलाला अवैध धंदे पकडून पंचनामा करण्याचे अधिकार देण्यात यावेत.**

ग्राम संरक्षक दल हातभट्टीची दारू किंवा अवैध धंदे पकडून पंचनामा करतील व संबधित पोलीस खात्याला किंवा उत्पादन शुल्क खात्याला कळवतील. ग्राम संरक्षक दलाने पंचनामा केल्याचे कळविल्यानंतर पोलीस दलाने व राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेला पंचनामा तातडीने ताब्यात घेऊन संबधितांवर गुन्हा दाखल करावा. **दाखल केलेल्या गुन्ह्याचा ग्राम संरक्षक दल त्यांच्यावर कार्यवाही होईपर्यंत पाठपुरावा करीत राहतील.**

अशा प्रकारे अवैध धंदे करणाऱ्या व्यक्तींवर तीन वेळा गुन्हे दाखल झाले तर त्या व्यक्तीला एक किंवा दोन वर्ष जिल्हा तडीपारची सजा करण्याची तरतूद या कायद्यात असावी. त्याचप्रमाणे महिलांवरील अन्याय, अत्याचार, बलात्कार यांसारख्या गुन्ह्याचे स्वरूप गंभीर असेल तर अशा गुन्हेगाराला तीन वर्षे ते दहा वर्षे कठोर कारावासाची शिक्षा असावी. अशा प्रकारची कठोर तरतूद कायद्यामध्ये झाली तरच महिलांवरील अन्याय, अत्याचार व अवैध धंदे याला आळा बसू शकेल. त्याचप्रमाणे दिवसेंदिवस देशी, विदेशी, हातभट्टीची दारू पिऊन गावात गोंधळ घालणे, भांडणे, मारामाऱ्या करणे असे प्रकार ही वाढत चालले आहेत त्यामुळे खेड्या-पाड्यातील शांततेचा भंग होऊन कायदा आणि सुव्यवस्थेला धोका

निर्माण होत चालला आहे. गावात दारू पिऊन अशा प्रकारे भांडणे, मारामाऱ्या करणाऱ्या व्यक्तीला ग्राम संरक्षक दलाने पकडून पोलीस खात्याला किंवा राज्य उत्पादन शुल्क खात्याला कळविले तर संबंधित खात्याच्या अधिकाऱ्याने तातडीने जाऊन अशा व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची तरतूद कायद्यात असावी. दारू पिण्याचा परवाना नसताना दारू पिऊन गावात शांततेचा भंग केल्यास कायद्याच्या कलमाप्रमाणे त्यांच्यावर एकपेक्षा अधिक गुन्हे दाखल करण्यात यावेत. तीन वेळेला असे गुन्हे दाखल झाल्यास त्या व्यक्तीला जिल्हा तडीपार करण्याची तरतूद कायद्यात असावी.

महिलांवरील अन्याय अत्याचाराला आणि अवैध धंद्यांना आळा बसावा यासाठी मी २७ जुलै २०१६ रोजी विधान भवनामध्ये मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री, सचिव यांच्याशी चर्चा करून ग्राम संरक्षक दलाला कायद्याने अधिकार देण्याबाबत चर्चा केली असता **कठोर कायदे करून ग्राम संरक्षक दलाला कायद्याने अधिकार देण्यात येतील असे मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिले आहे.** या दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही झाली तर महिलांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला आळा बसेल. मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीमध्ये असाही निर्णय झाला की, पूर्वी राज्य स्तर, विभागीय स्तर, जिल्हा स्तर, तालुका स्तरावर दारूबंदी कमिट्या स्थापन केलेल्या होत्या. त्या प्रमाणे राज्यात कमिट्या स्थापन करून प्रत्येक स्तरावर दारूबंदी बाबत आढावा घेतला जाईल. प्रत्येक तीन महिन्यानंतर मुख्यमंत्री स्वतः दारूबंदी बाबत राज्याचा आढावा घेतील.

राज्य उत्पादन शुल्क खात्याला दर वर्षी २३ हजार कोटी उत्पादन कर मिळतो. त्यापैकी २ टक्के रक्कम दारूबंदीविषयी लोकशिक्षण, लोकजागृतीसाठी खर्च केली जाईल जेणेकरून खेड्या-पाड्यात दारूबंदीचे वातावरण तयार होत राहील. ग्राम संरक्षक दलामार्फत ज्या विभागात अवैध धंद्यांचे अधिक पंचनामे होतील त्या विभागातील पोलीस खात्याचे आणि उत्पादन शुल्क खात्यांच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात यावे.

**परमिट, देशी, विदेशी दारू बंद करण्याची पद्धती –** ज्या गावात किंवा वॉर्डमध्ये शासनाच्या उत्पादन शुल्क विभागाने देशी दारू, विदेशी दारूचे परमिट दिलेले आहेत त्या गावातील २५ टक्के महिलांनी दारू दुकान बंद करण्याबाबत ठराव करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला तर जिल्हाधिकारी त्या जिल्ह्याचे राज्य उत्पादन शुल्कचे जिल्हा अधिकाऱ्यांना त्या गावातील महिलांच्या मागणीप्रमाणे पडताळणी करण्याचे आदेश देतील.

राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्याने गावात जाऊन पडताळणी केल्यानंतर महिलांनी केलेली मागणी योग्य आहे असे दिसून आल्यास उत्पादन शुल्क अधिकारी आपला अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवितील. जिल्हाधिकारी त्या गावातील दारू दुकान बंद व्हावे किंवा नाही यासाठी त्या गावात महिलांचे मतदान घेण्याचे ठरवतील आणि त्या गावातील मतदाराच्या संख्येनुसार त्या प्रमाणात निवडणूक बूथ असावेत जेणे करून मतदान करणे मतदारांना सुलभ होईल. त्या गावात निवडणूक घेण्याबाबत तहसिलदारांना कळवितील. सदर निवडणुकीमध्ये उभी बाटली आणि आडवी बाटली चिन्ह असेल. निवडणुकीमध्ये आडव्या बाटलीवर महिलांनी ५० टक्के मतदान मोजणीत स्पष्ट झाल्यास तहसिलदार आपला अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे देतील. जिल्हाधिकारी त्या गावातील दारू दुकाने बंद करतील. निवडणूक अधिकारी म्हणून तहसिलदारांनी ही प्रक्रिया पार पाडायची आहे. कोणत्याही गावात दारू उत्पादन शुल्क विभाग दारू दुकानाचा परवाना देताना ग्राम सभेची परवानगी असल्याशिवाय परवाना देणार नाहीत असे शासनाचे धोरण आहे. फक्त ग्राम पंचायतीच्या ना हरकत प्रमाणपत्रावर दारू दुकानाचा परवाना देता येत नाही. ग्रामसभेचा ठराव असणे आवश्यक आहे.

शासनाने राज्य उत्पादन शुल्क द्वारे वर्षाला २३ हजार कोटी रुपये उत्पन्न मिळते याचा विचार न करता महिलांवरील होणाऱ्या अन्याय, अत्याचार, बलात्कार, खून, मारामाऱ्या यामुळे युवा शक्तीची होणारी बर्बादी याचा विचार करावा. ही होणारी झीज २३ हजार कोटी रुपयांनी भरुन निघणार नाही. याचा विचार होणे आवश्यक आहे.

डॉक्टरांच्या सल्ल्याने दारू पिणाऱ्या व्यक्तीला दिलेल्या परमिटवर महिना दोन बाटल्या दिल्या जातील असा पूर्वी निर्णय होता. मात्र अलीकडेच राज्य उत्पादन शुल्क खात्याने महिन्याला १२ बाटल्यांचा परवाना देण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. डॉक्टरांच्या सल्ल्याने दिले जाणारे परमिट पूर्वीप्रमाणेच महिना २ बाटल्यांचा परवाना दिला जाईल असे मान्य करण्यात आले.

**गावागावामध्ये सर्व जाती-धर्माच्या चारित्र्यशील कार्यकर्त्यांनी संघटित होऊन ग्रामसंरक्षक दल स्थापनेचा प्रयत्न करायला हवा. अशा दलामध्ये युवक-युवती, इतर कार्यकर्ते, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्यांक अशा सर्व लोकांना संघटित करून ग्रामसंरक्षक दल स्थापन करण्याची आवश्यकता आहे. आमच्या भारतीय घटनेच्या आधारे समतेचा संदेश घेऊन गट-तटाचे राजकारण न करता आपल्या गाव, समाज, राज्य, राष्ट्राचे हित समोर ठेऊन ग्राम संरक्षक दल तयार करावेत. गावच्या पोलीस पाटलांचाही ग्राम संरक्षक दलात समावेश करण्यात यावा. ग्राम सभेने ठरविलेले ग्राम संरक्षक दल आणि पोलीस खाते किंवा राज्य उत्पादन शुल्क खाते यांनी एक दुसऱ्याच्या हातात हात घालून दारूबंदी आणि अवैध धंदे बंदीचे कार्य केले तर महाराष्ट्र राज्याचा आदर्श संपूर्ण देशातील जनता घेऊ शकेल असा विश्वास वाटतो.**

"ज्या कार्यकर्त्यांना दारूबंदीच्या चळवळीमध्ये सहभागी व्हायचे असेल त्यांनी आपल्या फोन व ईमेल सह खालील पत्त्यावर संपर्क साधावा."

आपला,

कि. बा. हजारे (अण्णा)

ऑगस्ट 2016

राळेगण सिद्धी

(कि. बा. तथा अण्णा हजारे)

राळेगण सिध्दी, ता. पारनेर, जि. अहमदनगर, पिन ४१४३०२ (महाराष्ट्र)
फोन : ०२४८८-२४०४०१ मो. नं. ०९८५०२०००९०
Email: annahazareoffice1@gmail.com
www.annahazare.org | www.joinannahazare.org.in